दी नॅशनल को- ऑपरेटिव्ह बँक लि.

१२-बी, वत्स हाऊस, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी : (०२२) २२०४७९४४ व २२०४८६२८

यांच्या आवारातील वसुली अधिकाऱ्यांच्या निष्पादक न्यायालयासमोर
प्रपत्र क्र. 'झेड'
(एमसीएस ॲक्ट, १९६० च्या रुल १०७ च्या पोट-कलम ११ (डी-१) व नियम, १९६१ पाहावे)

स्थावर मिळकतीसाठी कब्जा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी महाराष्ट्र को- ऑपरेटिव्ह सोसायटीज रुल, १९६१ अंतर्गत दी नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.शी निगडीत वसुली अधिकारी म्हणून दिनांक २३.११.२०१७ रोजी मागणी सूचना जारी करून न्यायनिर्णित कर्जदार मे. मैत्री ज्योत बिल्डर्स अँड डेव्हलपर्स-प्रोप्रा. श्री. दीपक कांतीभाई शाह आणि अन्य यांना सूचनेतील **रु.२,५८,४७,७७१/- (रुपये दोन करोड अठ्ठावन्न लाख सत्तेचाळीस हजार सातशे एक्काहत्तर मात्र)** रकमेची परतफेड पुढील व्याजासह सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून नमूद केलेल्या तारखेस करण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित कर्जदार रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकारांनी ०४.१२.२०१८ च्या जप्तीच्या सूचना जारी केल्या आणि येथे खाली वर्णन केलेली मिळकत जप्त केली.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी तारण मत्ता म्हणजेच फ्लॅट क्र. ४०४, ४ था मजला, ए विंग, साई अॅव्हेन्यू को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग लि., गाव नारिंगी, विरार (पू.), ता. पालघर, जि. पालघर-४०१ ३०५ ज्या जमिनीवरील बांधकाम त्याचा सर्व्हे क्र. ४६ (जुना), २१९ (नवीन), हिस्सा क्र. २, ४, ५, १३ आणि सर्व्हे क्र. २७ (जुना), २२० (नवीन), हिस्सा क्र. ११, १२, असलेले, वसलेले आणि स्थित गाव नारिंगी विरार नगर पालिकेच्या क्षेत्रात, तालुका वसई, जिल्हा पालघर याचा १८.०३.२०१९ रोजी प्रत्यक्ष कब्जा घेतला. वरील गहाण फ्लॅटचे भोगवटदार हे निम्नस्वाक्षरीकारांस त्याचा प्रत्यक्ष कब्जा स्वेच्छेने सुपूर्द केला आहे.

न्यायनिर्णित कर्जदारांनी रकमेची परतफेड करण्यात कसूर केल्याने याद्वारे न्यायनिर्णित कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा त्यांना महाराष्ट्र को- ऑपरेटिव्ह सोसायटीज रुल, १९६१ च्या नियम १०७ (११ (डी-१)) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ह्या १८ मार्च २०१९ रोजी घेतला.

विशेषत: न्यायनिर्णित कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी व्यवहार करू नये आणि मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार 'दी नॅशनल को- ऑपरेटिव्ह बँक लि.' च्या दि. २८.०२.२०१९ रोजीसचे रु. २,९४,२४,९८६/- व वसुलीपर्यंत त्यावरील व्याज अशा रकमेसाठी भाराधीन राहील.

स्थावर मिळकतीचे वर्णन

मिळकतीचे ते सर्व भाग व विभाग ज्यात फ्लॅट क्र. ए-४०४, ४ था मजला, ए विंग, साई अॅव्हेन्यू को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग लि., गाव नारिंगी, विरार (पू.), ता. पालघर, जि. पालघर-४०१ ३०५ ज्या जमिनीवरील बांधकाम त्याचा सर्व्हे क्र. ४६ (जुना), २१९ (नवीन), हिस्सा क्र. २, ४, ५, १३ आणि सर्व्हे क्र. २७ (जुना), २२० (नवीन), हिस्सा क्र. ११, १२, असलेले, वसलेले आणि स्थित गाव नारिंगी विरार नगर पालिकेच्या क्षेत्रात, तालुका वसई, जिल्हा पालघर च्या नोंदणीकृत जिल्ह्यात आणि वसईच्या उपनिबंधकाच्या न्यायाधिकारितेत.

सही/-
ठिकाण : मुंबई — **वसुली अधिकारी**
दिनांक : ३०.०३.२०१९ — **दी नॅशनल को- ऑप. बँक लि. शी निगडीत**

''प्रपत्र – ए''
जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हन्सी अँड बँक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)

एस. के. व्हील्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहितीसाठी

	संबंधित तपशील	
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	एस. के. व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	१०/०५/२००४
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनी निबंधक - मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर	यु५०५००एमएच२००४पीटीसी१४६१५७
५	कॉर्पोरेट कर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	प्लॉट क्र. डी-४०५, टीटीसी इंड. क्षेत्र, एमआयडीसी तुर्भे, नवी मुंबई, एमएच-४०० ७०५ भारत.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख	२९ मार्च, २०१८, २९ मार्च, २०१९ च्या नामदार एनसीएलटी, मुंबईच्या सी.पी. (आयबी) - सी.पी. (आयबी)-४३०१/आय अँड बीपी/(एमबी)/२०१८ आदेशाप्रमाणे) (प्राप्त झालेली प्रत ०२.०४.२०१९ रोजी मेलद्वारे).
७	नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख	२४.०९.२०१९ (नादारी सुरू होण्याच्या तारखेपासून १८० दिवस)
८	अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	विशाल घिसुलाल जैन आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००४१९/२०१७-१८/१०७४२.
९	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	सीए. विशाल जैन/५०२, जी स्क्वेअर बिझनेस पार्क, सानपाडा स्टेशन पश्चिमसमोर, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
१०	अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	सीए. विशाल जैन, ५०२, जी स्क्वेअर बिझनेस पार्क, सानपाडा स्टेशन पश्चिम समोर, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	१७ एप्रिल, २०१९
१२	अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास	वर्गा(र्गां) चे नाव अप्रयोज्य
१३	एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	अप्रयोज्य
१४	(ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत	वेब लिंक: http://ibbi.gov.in/downloadform.html प्रत्यक्ष पत्ता: वरील (१०) मध्ये दिल्याप्रमाणे प्रयोज्य प्रपत्रासाठी कृपया टीप १ बघा

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, २९ मार्च, २०१९ एस. के. व्हील्स लिमिटेड विरुध्द एक निगमीय नादारी निर्णय प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले.

एस. के. व्हील्स लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे अंतरिम निर्णय व्यावसायिकांकडे बाब १० समोरील पत्त्यावर १७ एप्रिल, २०१९ किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यात येते.

वित्तीय धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे व्यक्तिश: टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.

नोंद क्र. १२ समोर सूचिबध्द वर्गातील एखादा वित्तीय धनको त्यांच्या पसंतीचे प्राधिकृत प्रतिनिधी प्रपत्र सीएमधील **अप्रयोज्य** वर्गाचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्याकरिता नोंद क्र. १३ समोर सूचिबध्द तीन नादारी व्यावसायिकामधून निवडू शकतो.

टीप १: दाव्यांचे सादरीकरण इन्सॉल्व्हन्सी अँड बँक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या चॅप्टर ४ नुसार करावयाचे आहे. पुराव्यांसह दाव्यांना दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ कागदोपत्री पुराव्यांसह खालील विनिर्दिष्ट प्रपत्रामध्ये सादर करावे.

- फॉर्म बी- कामगार व कर्मचाऱ्यांखेरीज प्रचालन धनकोंकडून दावे.
- फॉर्म सी - वित्तीय धनकोंकडून दावे.
- फॉर्म सीए - एका वर्गातील वित्तीय धनकोंकडून दावे.
- फॉर्म डी - कामगार आणि कर्मचाऱ्यांकडून दावे.
- फॉर्म ई - कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या अधिकृत प्रतिनिधींकडून दावे.
- फॉर्म एफ - वित्तीय धनको आणि प्रचालन धनकों व्यतिरिक्त अन्य धनकोंकडून दावे.

दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर करणे म्हणजे दंडास आमंत्रण देणे ठरेल.

सही/-
अंतरिम निर्णय व्यावसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी: विशाल घिसुलाल जैन
दिनांक आणि ठिकाण: ३ एप्रिल, २०१९ नवी मुंबई.

State Bank of India

स्ट्रेस्ड ॲसेट्स रिकव्हरी ब्रांच (एसएआरबी)
१ ला मजला, केरोम बिल्डिंग, प्लॉट क्र. ए-११२, रोड क्र. २२ सर्कल
वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४. **फोन :** ०२२-२५८०६८१०/२५८०६८६२
ई-मेल : sarcthane@sbi.co.in, **फॅक्स:** ०२२-२५८०६८६३

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता विक्री सूचना
(नियम ८(६) च्या तरतुदी पहा)

सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत ज्याचा **सांकेतिक कब्जा** स्टेट बँक ऑफ इंडिया, तारण धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे त्या **मे. आभार इंटरनॅशनल (कर्जदार)** १. श्री. ललितकुमार मनिलाल चौहान (भागीदार), २. श्री. तेजस प्रविणचंद्र मेहता (भागीदार) आणि ३. श्री. भुपेंद्रकुमार मनिलाल चौहान (भागीदार) आणि हमीदार : १. श्री. तेजस प्रविणचंद्र मेहता, २. श्री. ललित चौहान, ३. श्री. भुपेंद्र मनिलाल चौहान आणि त्रयस्थ पक्षकार हमीदार १. सौ. छाया भुपेंद्र चौहान, २. सौ. अंजना एल. चौहान, ३. श्री. बिपिन चंद्र एम चौहान, ४. सौ. हन्सा प्रविणचंद्र मेहता, ५. श्री. आशिष प्रविणचंद्र मेहता यांचेकडून तारण धनकोना थकीत **मागणी सूचना तारीख : १९.१०.२०१८** अंतिम प्रदानाच्या तारखेपर्यंत २०.१०.२०१८ पासून उपार्जित व्याज आणि इतर प्रभार अधिक १९.१०.२०१८ रोजीस रु. ८,०२,१०,६२८.३० (रु. आठ कोटी दोन लाख दहा हजार सहाशे अठ्ठावीस आणि पैसे तीस मात्र) च्या वसुलीसाठी प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह **०७.०५.२०१९ रोजी वेळ: स. १०.०० ते स. ११.०० दरम्यान ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने विकण्यात येणार आहेत.

स्थावर मिळकतीचे वर्णन आणि राखीव किंमत तपशील :

मिळकत क्र. १ :
मिळकतीचे मालक : श्री. ललित मनिलाल चौहान
रहिवासीत फ्लॅट क्र. २, तळमजला, इमारत क्र. १७, एफएएम को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, बालाजी गार्डन सोसायटी जवळ, प्लॉट क्र. १९ आणि १९ए, सेक्टर ११, कोपरखैरणे, नवी मुंबई-४०० ७०९, बिल्टअप क्षेत्र ८०४ चौ.फू.
राखीव किंमत रु. ९५,००,०००.०० आणि इसारा अनामत रक्कम **(इअर) रु. ९,५०,०००.००.** ही राहील. इअर आणि सहभागी होण्याचे विनंती पत्र/केवायसी दस्तावेज/इअरचा पुरावा **०३.०५.२०१९ रोजी किंवा पूर्वी ५ वाजेपर्यंत** बँकेमध्ये जमा करावा.
बोली वाढविण्याची रक्कम : रु. १,००,०००.००

मिळकत क्र. २ :
मिळकतीचे मालक : श्री. बिपिनचंद्र एम. चौहान, श्रीम. छाया चौहान, श्रीम. अंजना एल. चौहान
शॉप नी गोडाऊन क्र. एच-४३, तळमजला, एच ब्लॉक, एपीएमसी मार्केट I, फेज II, प्लॉट क्र. २, सेक्टर क्र. १९, गट क्र. ७९६ गाव तुर्भे, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३, बिल्टअप क्षेत्र १६५८ चौ.फू.
राखीव किंमत रु. २,९९,००,०००.०० असेल आणि इसारा अनामत रक्कम **(इअर) रु. २९,९०,०००.००** असेल. इअर आणि सहभागी होण्याचे विनंती पत्र/केवायसी दस्तावेज/इअरचा पुरावा **०३.०५.२०१९ रोजी किंवा पूर्वी ५ वाजेपर्यंत** बँकेमध्ये जमा करावा.
बोली वाढविण्याची रक्कम : रु. १,००,०००.००

मिळकत क्र. ३ :
मिळकतीचे मालक : तेजस मेहता, आशिष मेहता आणि हन्सा मेहता
फ्लॅट क्र. ६, १ ला मजला, सी-३९/एस विंग, कुमकुम को-ऑप. हाऊ., एम. जी. कॉम्प्लेक्स, सेक्टर क्र. १४, वाशी, नवी मुंबई, जि. ठाणे-४०० ७०५, बिल्टअप क्षेत्र ६३५ चौ.फू.
राखीव किंमत : रु. ८१,९६,०००.०० असेल आणि इसारा अनामत रक्कम **(इअर) रु. ८,१९,६००.००** राहील. इअर आणि सहभागी होण्याचे विनंती पत्र/केवायसी दस्तावेज/इअरचा पुरावा **०३.०५.२०१९ रोजी किंवा पूर्वी ५ वाजेपर्यंत** बँकेमध्ये जमा करावा.
बोली वाढविण्याची रक्कम : रु. १,००,०००.००

निरीक्षणाची तारीख : ३०.०४.२०१९ दु. १२. ते दु. १. (संपर्क श्रीम. सुष्मा चौधरी : ९८१९९०३५५५)
इअर जमा करावयाचे खाते : एसएआरबी ठाणे पेमेंट खाते क्र. ३१०४९५७५१५५, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१०५३
विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरिता कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारण धनकोंची वेबसाईट **https://www.sbi.co.in** आणि **https://sbi.auctiontiger.net** मध्ये पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

दिनांक : ०३.०४.२०१९ — **(श्री. मनोज कुमार)**
ठिकाण : ठाणे — **प्राधिकृत अधिकारी**
मोबा. क्र. ८४१९९३७७०४

सूचना

श्री. अयिनिप्पल्ली गोविंदन पुष्पराजन, एव्हरस्वीट अपार्टमेंटस् को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटडचे सदस्य ज्यांचा पत्ता सात बंगलो, जेपी रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३ आणि ज्यांनी सोसायटीच्या बिल्डिंगमध्ये फ्लॅट धारण केला आहे, त्यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता ४ जानेवारी, २०१९ रोजी निधन झाले. सोसायटी याद्वारे सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमध्ये मयत सदस्याच्या सदर शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाला वारस वा इतर दावेदार/हरकतदारांकडून सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमध्ये मयत सदस्याच्या शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरण त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/हरकतींच्या पुष्ठ्यर्थ असे दस्तावेज आणि इतर पुराव्यांच्या प्रतिसह, सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीत दावे वा हरकती मागवित आहे. जर १५ दिवसांच्या कालावधीत दावे/हरकती प्राप्त न झाल्यास, सोसायटीच्या उपविधि अन्वये पुरविण्यात आल्याप्रमाणे पद्धतीने सोसायटीच्या उपविधि अन्वये पुरविण्यात आलेल्या पद्धतीने सोसायटीच्या भांडवल/मिळकतीतील मयत सदस्याचे शेअर्स आणि हितसंबंधासह व्यवहार करण्यास सोसायटी मुक्त असेल. सोसायटीच्या, नोंदणीकृत उपविधिची प्रत दावेदार/हरकतदारांद्वारा निरिक्षणाकरिता सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून त्याचा कालावधीची तारीख संपेपर्यंत सोसायटीच्या कार्यालयात स. १०.३० ते सायं. १२.३० दरम्यान उपलब्ध आहे.

करिता आणि च्या वतीने
ठिकाण : मुंबई — **एव्हरस्वीट अपार्टमेंटस् को-ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड**
तारीख : ४ एप्रिल २०१९ — **मानद सचिव**

punjab national bank
...the name you can BANK upon!

शा.खा.: चेंबूर कॅम्प
१२, गोन्साल्विस बिल्डिंग, आशिष थेएटरजवळ, मुंबई
दूर. क्र. ०२२-२५५४६०४०
ई-मेल: bo1299@pnb.co.in

जोडपत्र IV
कब्जा सूचना
[नियम ८(१)]
(स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी **पंजाब नॅशनल बँके**चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेट्स अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (अ‍ॅक्ट), २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून कर्जदार/गहाणदार/हमीदार **श्री. डॅनियल व्ही. वर्गीस (प्रोप्रायटर मे. मास्टर टायर वर्क्स) आणि सौ. शानी डॅनियल व्ही. वर्गीस** यांना सूचनेत नमूद केलेली दि. **१२.१०.२०१८** रोजीची बँकेस देय रक्कम **रु. ५३,३९,५२२.२१/- (रुपये त्रेपन्न लाख एकोणचाळीस हजार पाचशे बावीस आणि एकवीस पैसे मात्र)**त्यावरील पुढील व्याज ही रक्कम सदरहू सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता **०३.११.२०१८** रोजी मागणी सूचना निर्गमित केलेली आहे.

कर्जदार/गहाणदार/हमीदार यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार/गहाणदार/हमीदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी त्याला/तिला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून सदरहू अधिनियमाचे कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावली २००२ च्या नियम ८ अन्वये याखाली वर्णिलेल्या मिळकतीचा **२९ मार्च, २०१९** रोजी **सांकेतिक** कब्जा घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा **पंजाब नॅशनल बँक, चेंबूर शाखे**करिता रक्कम **रु. ५३,३९,५२२.२१/- (रुपये त्रेपन्न लाख एकोणचाळीस हजार पाचशे बावीस आणि एकवीस पैसे मात्र)** आणि त्यावरील व्याज या रकमेच्या आकाराच्या अधीन राहील.

तारण मत्तेच्या भरण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात अ‍ॅक्टच्या कलम उप-कलम(१३) (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. ०२, तळमजला, बिल्डिंग क्र. इ-९०, सन शाईन सीएचएसएल, प्लॉट क्र. १, सेक्टर क्र. ६, गाव - रोडपाली, कळंबोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, श्री. डॅनियल व्ही. वर्गीस यांच्या नावावर.

सही/-
पंजाब नॅशनल बँक
ठिकाण : कळंबोली, नवी मुंबई — **(श्री. राजेश गुप्ता, मुख्य व्यवस्थापक)**
दिनांक : २९.०३.१९ — **प्राधिकृत अधिकारी**

जाहीर सूचना

सर्व संबंधिताळस या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते की, खालील तपशिलवार दिलेली मालमत्ता **श्री. सखाराम नारायण पाटील व इतर** यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदर मिळकत जुना सर्व्हे नं. ६२, नवीन सर्व्हे नं. ११०, हिस्सा नं. ६ ही सदर मिळकत गाव मौजे गोडदेव, तालुका व जिल्हा ठाणे, भाईंदर पूर्व, मिरा-भाईंदर महानगर-पालिकेच्या हद्दीत स्थित आहे. सदर मिळकती त्यांनी माझे अशिलांस कायमची विकण्याचे व विकासाचे सर्व हक्क हस्तांतरित करण्याचे मान्य व कबूल केले आहे.

सदर मिळकतींवर कोणत्याही इसमांचा, व्यक्तीचा वा संस्थेचा गहाण, दान, बोजा, कुळ, वहिवाट, दावा, विक्री, फरोक्त, अदलाबदल, भाडेपट्टा इत्यादी वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध वा अधिकार असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सदर इसमांनी १४ दिवसांचे आत सर्व त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासहित मार्कंडे निवास, एच. टी. रोड, काजूपाडा, बोरिवली (पू.), मुंबई-४०० ०६६ ह्या कार्यालयीन पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी, अन्यथा तसा कुणाचाही व कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही वा असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील ह्याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. कागदोपत्री पुराव्याविना आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दिनांक: ०४/०४/२०१९.

सही/-
एस. पी. सिंग
मालकांचे वकील

जाहीर सूचना

सर्व संबंधितांस या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते की, खालील तपशीलवार दिलेल्या मालमत्तेमध्ये **श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर (एच. यु. एफ.)** यांचा सामाईक व अविभाजित ५०% हिश्श्याची, मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदर मिळकत जुना सर्व्हे नं. ९४ नवीन सर्व्हे नं. ३८, हिस्सा नं. १३, मोजमापाने १०.६ गुंठे वा १०६० चौरस मीटर, ही सदर मिळकत गांव मौजे राई, तालुका व जिल्हा ठाणे, मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत स्थित आहे. **श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर (एच. यु. एफ.)** यांनी सदर मिळकतीचे त्यांचे ५०% सामाईक व अविभाजित हिस्सा माझे अशिलांस कायमची विकण्याचे व विकासाचे सर्व हक्क हस्तांतरित करण्याचे मान्य व कबूल केले आहे.

सदर मिळकतीवर कोणत्याही इसमांचा, व्यक्तीचा वा संस्थेचा गहाण, दान, बोजा, कुळ, वहिवाट, दावा, विक्री, फरोक्त, अदलाबदल, भाडेपट्टा इत्यादी वा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध वा अधिकार असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सदर इसमांनी १४ दिवसांचे आत सर्व त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासहित मार्कन्डे निवास, एच. टी. रोड, काजूपाडा, बोरिवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६ ह्या कार्यालयीन पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी अन्यथा तसा कुणाचाही व कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही वा असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील ह्याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. कागदोपत्री पुराव्याविना आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

मुंबई: ०४/०४/२०१९ — सही/-
एस. पी. सिंग
मालकांचे वकील

पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)
नों. कार्यालय : बी-९, कुतब इन्स्टिट्युशनल एरिया, कटवारिया सराई,नवी दिल्ली-११० ०१६.
कॉर्पोरेट कार्यालय : 'सौदामिनी', प्लॉट क्र. २, सेक्टर-२९, गुरगाव-१२२ ००१ (हरयाणा)
वेबसाईट : www. powergridindia.com **सीआयएन :** एल४०१०१ डीएल१९८९ जीओआय०३८१२१
पावरग्रिड

सूचना

१. डीओसीओपासून ३१.०३.२०१९ पर्यंत पारेषण दर ठरविण्यासाठी सीईआरसी (कंडक्ट ऑफ बिझनेस) रेग्युलेशन्स, १९९९ च्या रेग्युलेशन - ८६ आणि सीईआरसी (टर्म्स अ‍ॅण्ड कंडिशन्स ऑफ टेरिफ) रेग्युलेशन्स २०१४ अंतर्गत मंजुरी. **''मत्ता-I:** दक्षिण क्षेत्रातील सध्याच्या युएलडीसी मायक्रोवेव्ह लिंक्सच्या बदल्यात फायबर ऑप्टिक कम्युनिकेशन सिस्टीम प्रकल्पाअंतर्गत सहयोगी दळणवळण उपरणांसह मध्य क्षेत्राच्या निला मंगला-येलाहांका (३९.००६ कि.मी.) ओपीजीडब्ल्यू फायबर कम्युनिकेशन लिंक''.

२. **उपरोल्लेखित पारेषण प्रणालीचे लाभार्थी आहेत :** १) एनटीपीसी २) एनएलसी ३) एनपीसीआयएल ४) एनटीईसीएल ५) एमईपीएल ६) एसईपीएल ७) एलएएनसीओ ८) केपीटीसीएल ९) एपीटीआरएनएससीओ १०) केएसईबी ११) टीएनईबी १२) इलेक्ट्रिसिटी डिपार्टमेंट ऑफ गोवा १३) इलेक्ट्रिसिटी डिपार्टमेंट ऑफ पुदुचेरी.

३. **दर तपशील :**

मत्तेचे नाव	मत्ता-I
मंजुर भांडवली खर्च (**रु. लाखात**)	१०३.४५
भांडवली खर्चास मंजुरी देणारे प्राधिकरण	संचालक मंडळ, पॉवर ग्रीड
निर्धारित डीओसीओ (पासून)	१४.०८.२०१३
डीओसीओ (प्रत्यक्ष)	२८.०३.२०१८ (प्रत्यक्ष)
अंदाजित पूर्तता खर्च (**रु. लाखात**)	९७.५५
ब्लॉक २०१४-१९ साठी दर (**रु. लाखात**)	
२०१४-१५	-
२०१५-१६	-
२०१६-१७	-
२०१७-१८	०.४४
२०१८-१९	१९.२६

४. दर ठरवण्यासाठी केलेल्या अर्जाची एक प्रत अर्जदारांची वेबसाईट **www.powergridindia.com** वर प्रदर्शित केली आहे.

५. अर्जातील दर ठरविण्यासाठीच्या प्रस्तावावर कोणत्याही सूचना आणि आक्षेप असल्यास, लाभार्थींसह कोणत्याही व्यक्तींनी ह्या सूचनेच्या प्रसिध्दीच्या ३० दिवसांत सेक्रेटरी, सेंट्रल इलेक्ट्रिसिटी रेग्युलेटरी कमिशन, ३ रा व ४था मजला, चंद्रलोक बिल्डिंग, जनपथ, नवी दिल्ली-११० ००१ (किंवा आयोगाचे कार्यालय असलेल्या अन्य पत्त्यावर) येथे सादर करावेत व त्याची एक प्रत अर्जदारांना त्यांच्या कॉर्पोरेट कार्यालयात **''सौदामिनी', प्लॉट क्र. २, सेक्टर-२९, गुरगाव-१२२००१, हरयाणा येथे पाठवावी.**

ठिकाण : गुरगाव — **सही/-**
दिनांक : २६.०३.२०१९ — **डीजीएम (कमर्शिअल)**

''एमओपी अ‍ॅप्स मिळवण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००२००३००४ वर एक मिस्ड कॉल द्या''

PG/CC/Notice-72/Advt-144/2018-19airads

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मध्ये

३ रा मजला, टेलिफोन भवन, स्ट्रँड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, मुंबई - ४००००५.
हस्तांतरित वसुली कार्यवाही क्र. ३०८ सन २०१६

हस्तांतरित खटल्यामधील सूचना

परिशिष्ट क्र. २५
पुढील तारीख : १५/०४/२०१९

कॉर्पोरेशन बँक ...अर्जदार
विरुद्ध
अशोक बी. जगडा आणि अन्य ...प्रतिवादी

सूचना घ्यावी की, एमडीआरटी-III मधील प्रलंबित वरील पक्षकारांच्या दरम्यानच्या आर.पी. क्र. ११५ सन २०१९ मधील खटला हा दिनांक २६/०९/२०१६ रोजीचा भारत सरकार एफ. क्र. १८.०२.२०१६ डीआरटी/(एस.ओ.३०६५(ई))द्वारे अधिसूचित न्यायाधिकरणाच्या बदलानुसार सदर न्यायाधिकरणाकडे हस्तांतर करण्यात आला आहे आणि सदर खटला हा सदर न्यायाधिकरणाच्या फाईलवर टी.आर.पी. क्र. ३०८ सन २०१६ म्हणून नोंदविण्यात आला आहे.

त्यामुळे तुम्हाला सदर सन्मा. न्यायाधिकरणासमक्ष व्यक्तिशः किंवा यथायोग्य माहिती असलेल्या वकिलांमार्फत **१५/०४/२०१९ रोजी दु. १२.३० वा.** उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत, कसूर केल्यास योग्य तो आदेश मंजूर करण्यात येईल.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने २८ मार्च, २०१९ रोजी दिले..

सही /-
सुजीत कुमार
वसुली अधिकारी,
डीआरटी-II, मुंबई

प्रति,
१) श्री. अशोक बाबुलाल जगडा
बी/२७, जी. के. नगर क्र. २, शंकर लेन, कांदिवली (प), मुंबई - ४०००६७.
२) श्री. धर्मेश अशोक जगडा
बी/२७, जी. के. नगर क्र. २, शंकर लेन, कांदिवली (प), मुंबई - ४०००६७.

जाहीर सूचना

ठाणे येथे ३ रे संयुक्त दिवाणी न्यायाधीश
श्रीमती भाटिया मॅडम (वरिष्ठ विभाग)
ठाणे यांच्या न्यायालयात
सर्वसाधारण दिवाणी वाद क्र.
७७८ सन २०१७
निशाणी-०७

मायकेल इग्नेस रोझारिओ
वय सुमारे ५५ वर्षे,
व्यवसाय - धंदा
राहणार रिटा इग्नेस चाळ,
निर्वादेवी नगर, पेणकर पाडा,
दहिसर चेकनाका,
पोस्ट-मिरा रोड, जि. ठाणे ......वादी
विरुध्द
१) वेणू के. कोळगे
यांचे ज्ञात नसलेले
कायदेशीर वारस
खोली क्र. १, चाळ क्र. ए,
रिटा चाळ, निर्वादेवी नगर,
पेणकर पाडा,
दहिसर चेकनाका,
पोस्ट-मिरा रोड, जि. ठाणे

प्रति,
प्रतिवादी क्र. १

ज्याअर्थी वरील नावाच्या वादींनी रिटा चाळ, निर्वादेवी नगर, पेणकर पाडा, दहिसर चेकनाका, पोस्ट मीरा रोड, जि. ठाणे मधील खोली क्र. १, चाळ क्र. ए चा कब्जा आणि भाड्याच्या थकबाकीच्या वसुलीकरिता प्रतिवादींच्या विरुध्द वाद दाखल केला आहे.

तुम्हाला याद्वारे ३ रे संयुक्त दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ विभाग ठाणे यांच्यासमोर २० एप्रिल, २०१९ रोजी स. ११.०० वा., व्यक्तिशः किंवा वादाशी संबंधित सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल आणि यथायोग्य माहिती पुरविलेल्या रितसर प्राधिकृत वकिलाद्वारे (वा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा अन्य व्यक्तींसह) हजर होण्यासाठी कळविण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्ही सूचना घेणे आवश्यक आहे की, अगोदर नमूद केलेल्या दिवशी हजर राहण्यात तुम्ही कसूर केल्यास वादावर एकतर्फी सुनावणी होईल.

न्यायालयाच्या शिक्क्यान्वये दिले
सदर ३० मार्च, २०१९
सही/-
प्रबंधक

पिगासस अ‍ॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

PEGASUS
५५-५६, ५ वा मजला, फ्री प्रेस हाऊस, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
फोन : (०२२)६१८८ ४७०० **फॅक्स क्र.** (०२२) २२८४ ६७९७.
ईमेल: sys@pegasus-arc.com **युआरएल:** www.pegasus-arc.com

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (सरफैसी अ‍ॅक्ट) च्या कलम १३ (२) अन्वये आमच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे निर्गमित दिनांक **१२/०७/२०१८** रोजीच्या मागणी सूचनेअन्वये कर्जदार **मे. वैदेही डायकेम प्रोप्रायटर श्री. राजेश हरिशचंद्र डहाणुकर, सौ. रश्मी राजेश डहाणुकर, श्री. सुरेश राजाराम कुंभार, श्री. प्रदीप दयानंद खोपकर** यांना सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रक्कम **रु.१,२६,६९,०९७.६१/-**(रुपये एक कोटी सव्वीस लाख एकोणसत्तर हजार सत्त्याण्णव आणि एकसष्ट पैसे मात्र) दिनांक **१५/०६/२०१८** च्यासह दिनांक **१६/०६/२०१८** रोजीपासून त्यावरील पुढील व्याज, दर, प्रभार आणि खर्च या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

त्यानंतर, सदर कर्जदारांचे थकीत व्यासह त्याअंतर्गत येणारे तारण व्याज जे **पिगासस अ‍ॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**, जे सरफैसी अ‍ॅक्टच्या तरतुदीन्वये दिनांक २७/०३/२०१८ रोजीच्या अभिहस्तांकन कराराद्वारे अपना सहकारी बँकेद्वारे पिगासस ग्रुप थर्टी थ्री ट्रस्ट I (पिगासस) यांचे ट्रस्टी म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत असून त्यांच्या नावे अभिहस्तांकित केले.

रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा त्यांना सदर अ‍ॅक्टच्या कलम १३ (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२च्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **०२/०४/२०१९** रोजी घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा पिगाससच्या रक्कम **रु.१,२६,६९,०९७.६१/-**(रुपये एक कोटी सव्वीस लाख एकोणसत्तर हजार सत्त्याण्णव आणि एकसष्ट पैसे मात्र) दिनांक **१५/०६/२०१८** च्यासह दिनांक **१६/०६/२०१८** रोजीपासून त्यावरील सांपार्श्विक दराने व्याज, दर, प्रभार आणि खर्च या रकमेच्या भाराअधीन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

गाव मालवणी, तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या सीटीएस क्र. ३५२५/ए, स. क्र. २६३ धारक जमिनीवरील मुंबई शहर आणि मुंबई उपनगराच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप-जिल्ह्यातील मोजमापित ७३६ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्र असलेल्या फ्लॅट क्र. ३०३, बी विंग, मालवणी श्री अष्टविनायक को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, ३ रा मजला, प्लॉट क्र. २५, आरएससी २, मालवणी, मालाड (प.), मुंबई-४०० ०९५ चे समन्याय गहाण.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई — **पिगासस अ‍ॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
दिनांक : ०२-०४-२०१९ — **पिगासस ग्रुप थर्टी थ्री ट्रस्ट I चे ट्रस्टी म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत**

कोटक महिंद्र बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: २७ बीकेसी, सी - २७, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-४०००५१.
शाखा कार्यालय: १५९-ए, पहिला मजला, सॅमसंग बिल्डिंग, सी.एस.टी. रोड, कलिना, सांताक्रुझ (पू), मुंबई- ४०००९८

सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना

तुम्ही खाली वर्णन केलेल्या कर्जदार, सहकर्जदार आणि हमीदारांनी तुमच्या स्थावर मिळकती गहाण ठेऊन (तारण) **फुल्लरटन इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड कडुन** कर्ज (कर्जे) सुविधा घेतली व त्याची परतफेड करण्यात कसूर केली. तुम्ही कसूर केल्याच्या परिणामी तुमच्या कर्ज खात्यांचे वर्गीकरण नॉन-परफॉर्मिंग अ‍ॅसेटस् असे करण्यात आले. दिनांक **२२.०२.२०१८ रोजीच्या अभिहस्तांकन विलेखाने** तुमच्या संबंधित दस्तावेजांप्रमाणे तुमच्याकडून येणे असलेली थकबाकी, सर्व अधिकार, हक्क, हितसंबंध, लाभ त्याच्या परतफेडीसाठी स्थावर मिळकतींच्या संबंधात तयार केलेल्या तारण हितसंबंधांसह **कोटक महिंद्र बँक लिमिटेड**च्या नावे/कडे अभिहस्तांकित केले. बँकेने सदर अभिहस्तांकनाला अनुसरून आणि थकीत रकमेच्या वसुलीसाठी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (अ‍ॅक्ट) च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना जारी केली ज्याची बजावणी होऊ शकलेली नाही आणि म्हणून सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३(१) सहवाचता अ‍ॅक्टच्या कलम १३(२) प्रमाणे त्यातील मजकूर येथे प्रकाशित करण्यात येत असून तुमच्यावर पर्यायी बजावणी करण्यात येत आहे. कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार, तारण, थकबाकी रक्कम, कलम १३(२) अन्वये पाठविलेल्या मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेल्या रकमा त्यांचे तपशील खालीलप्रमाणे:

कर्जदार, सह-कर्जदार यांचे नाव आणि पत्ता, कर्ज खाते क्र., कर्जाची रक्कम	स्थावर मिळकतीचे वर्णन	१) मागणी सूचनेची तारीख २) देय रक्कम रुपयांमध्ये
मे. हनी टेस्ट प्रा. लि. आणि मे. शिल्पा बेव्हरेजेस प्रायव्हेट लि. द्वारा तिचे संचालक श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपूत दोघांचाही पत्ता: १३०८, १३वा मजला, मयुरेश कॉसमॉस, सेक्टर २, बेलापूर, ठाणे-४०० ६१४, दोघांचाही पत्ता येथे सुद्धा दुकान क्र. ९, तळ मजला, साई विहार बिल्डिंग, प्लॉट क्र. ७८,७९ आणि ८०, सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. **मे. शिल्पा बेव्हरेजेस प्रा. लि.**	प्लॉट क्र. ७८, ७९ आणि ८०, सेक्टर-१५, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे स्थित साई विहार अशा ज्ञात इमारतीमधील मोजमपित ५४० चौ.फू. तळमजल्यावरील दुकान क्र. ९ धारक मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग **गहाणवटदाराचे नाव:** श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपुत	१. २२.०३.२०१९ २. २२.०३.२०१९ रोजीस देय आणि थकीत रु. १,३७,२८,०६८/- (रूपये एक कोटी सदतीस लाख अठ्ठावीस हजार अडुसष्ट मात्र) सह संपूर्ण प्रदानापर्यंत २२.०३.२०१९ पासून संपूर्ण देयापर्यंत मासिक आधारे द.सा. १०.२५% आधारे पुढील व्याज प्रयोज्य व्याज.

येथे सुद्धा ६०३, ६वा मजला, बिल्डिंग क्र. ६, गुरु शरणन कॉम्प्लेक्स, एम.जी. रोड, पनवेल-४१० २०६.
श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपूत, श्री. देवप्रकाश हरबंसल राजपूत, श्री. कपिल देवप्रकाश राजपूत, श्री. मुरूगेसन आदिमूलन आणि श्री. हेमल नबिन जोबानपुत्र सर्व राहणार: फ्लॅट क्र. ६०३, नीळकंठ गार्डन, पीएल-२९/५, पनवेल, मुंबई-४१० २०६, **सर्व येथे सुद्धा** ६०३, ६वा मजला, बिल्डिंग क्र. ६, गुरू शरणम कॉम्प्लेक्स, एम. जी. रोड, पनवेल-४१० २०६
कर्ज खाते क्रमांक: १६६२३७२००००००२० आणि १६६२३७३००००००२०
मंजूर कर्ज रक्कम: रु. ६८,००,०००/- (रुपये अडुसष्ट लाख मात्र) कर्ज खाते क्र. रु. १६६२३७२००००००२० अंतर्गत रु. ४१,००,०००/- कर्ज खाते क्र. १६६२३७३००००००२० अंतर्गत रु. २७,००,०००/- अशा कर्जाच्या मार्गाने.

म्हणून तुम्हा कर्जदार व सह-कर्जदार आणिहमीदार ह्यांना ह्या सूचनेच्या ६० दिवसांत पुढील व्याजासह वरील मागणी केलेल्या थकबाकी रकमेचे संपूर्ण प्रदान करण्यास सांगण्यात येत आहे, कसूर केल्यास वरील तारणांच्या सक्त वसुलीसाठी सदर अ‍ॅक्ट अन्वये कारवाई करणे निम्नस्वाक्षरीकारांना भाग पडेल.
तुमचे लक्ष अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदीकडे वेधण्यात येत आहे ज्याच्या सुकृताद्वारे तुम्हाला वरील सदर तरतुदीमध्ये विहित कालावधीत तारण मत्ता विमोचनासाठी स्वातंत्र्य आहे.
कृपया हे सुध्दा ध्यानात ठेवा की, अ‍ॅक्टच्या कलम १३(१३) प्रमाणे दरम्यानच्या काळात तुम्हाला, आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने उपरोक्त गहाण मिळकतींचे हस्तांतरण करण्यास मज्जाव करण्यात येत आहे.

ठिकाण : मुंबई — **कोटक महिंद्र बँक लि.करिता**
दिनांक : ०४.०४.२०१९ — **प्राधिकृत अधिकारी**

Standard Chartered

स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक
ग्रुप स्पेशल अ‍ॅसेट मॅनेजमेंट, क्रेसेंझो, ७ वा मजला, सी-३८/३९, जी-ब्लॉक, एमसीए क्लब मागे, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दूरध्वनी : + ९१-९८१९९६०१०९
ई-मेल : Kamal.vyas@sc.com

विक्रीसाठी जाहीर सूचना

'जसे आहे जेथे आहे तत्त्वाने' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वाने' सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ अन्वये स्थावर मिळकतीची विक्री.

स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेच्या तारण कर्जाच्या वसुलीसाठी २६.०२.२०१५ रोजी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना जारी केल्यानुसार आणि त्यानंतर सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या तरतुदीन्वये प्राधिकृत अधिकाऱ्यांनी २२.११.२०१७ रोजी घेतलेल्या प्रत्यक्ष कब्जाच्या अनुषंगाने स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी 'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वाने' खालील रकान्यात वर्णन केलेल्या मिळकतीच्या खरेदीसाठी मोहोरबंद पाकिटातून प्रस्ताव मागवले आहेत.

कर्जदार/जामीनदार/गहाणकारांचे नाव आणि थकबाकी	मिळकतीचे वर्णन, राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या लिलावाची तारीख आणि वेळ
मे. राधा रुक्मणी स्पीनर्स प्रा. लि., श्री. प्रदीप सुंदरलाल गोयल, सौ. सुमन प्रदीप गोयल आणि थकबाकी ३१.०१.२०१५ रोजीस रु. २९,७८,५८,२०२.४७ (रुपये एकोणतीस कोटी अठ्ठ्याहत्तर लाख अठ्ठावन्न हजार दोनशे दोन आणि पैसे सत्तेचाळीस मात्र) अधिक अंतिम प्रदानाच्या तारखेपर्यंत उपार्जित/वसूल न झालेले व्याज, अनुषंगिक खर्च, परिव्यय, प्रभार इ.	बंगला क्र. एव३-११, ए एनक्लेव्ह, नीलकंठ वूडस्, टिकूजीनीवाडी जवळ, मानपाडा, ठाणे (पश्चिम)-४००६१० येथे असलेली निवासी मिळकत. राखीव किंमत : रु. ७,००,००,०००/- (रुपये सात कोटी मात्र) इअर : रु.७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख मात्र)	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ २२.०४.२०१९ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० मिळकतीच्या लिलावाची तारीख आणि वेळ ३०.०४.२०१९ रोजी स. ११.०० पासून.

अटी आणि शर्ती

१) लिलाव स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक, ग्रुप स्पेशल अ‍ॅसेट मॅनेजमेंट ब्रांच, क्रेसेन्झो, ७ वा मजला, सी-३८/३९, जी-ब्लॉक, एमसीए क्लबमागे, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१ येथे घेण्यात येईल.
२) मुंबई येथे देय स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेच्या नावातील पे-ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट स्वरुपातील इअरसह मोहोरबंद प्रस्ताव २९.०४.२०१९ रोजी किंवा पूर्वी सं. ६.०० पर्यंत स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक, ७ वा मजला, ग्रुप स्पेशल अ‍ॅसेट मॅनेजमेंट ब्रांच, प्लॉट क्र. सी-३८/३९, जी-ब्लॉक, एमसीए क्लबमागे, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१ येथे पोहोचले पाहिजेत. राखीव किंमतीखालील/इअरशिवायचे/अर्हताकारी/सशर्त प्रस्ताव अपात्र ठरतील.
३) प्रस्ताव ३०.०४.२०१९ रोजी स. ११.०० वा. प्राधिकृत अधिकारी वरील पत्त्यावरील स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेच्या शाखेत उपलब्ध/ इच्छुक बोलीदारांच्या उपस्थितीत उघडतील. पुढे, ते निविदा उघडतेसमयी हजर राहू शकतात. निविदा उघडल्यानंतर, इच्छा असल्यास त्यांचे प्रस्ताव वाढविण्याची संधी निविदाकार/संभाव्य खरेदीदारांना दिली जाईल. निविदा उघडल्यानंतर, प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या मर्जी आणि निर्णयानुसार निविदाकार/बोलीदारांना आपापसांत बोली लावून त्यांचे प्रस्ताव सुधारण्याची एक संधी दिली जाईल. आपापसातील बोली रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) च्या पटीत वाढविण्यास परवानगी दिली जाईल. म्हणून त्यांना त्याने स्वत:/तिने स्वत:/त्यांनी स्वत: व्यक्तिश: किंवा त्यांच्या रितसर प्राधिकृत आणि अधिकारी असलेल्या प्राधिकृती दस्तावेजासह प्रतिनिधीमार्फत हजर राहण्याचा सल्ला देण्यात येतो. बोली उघडतेसमयी निविदाकारांनी ओळखीचा पुरावा बरोबर आणावा.
राखीव किंमतीखालील कोणताही प्रस्ताव/बोली विचारात घेतली जाणार नाही.
४) विक्री निश्चित झाल्यावर, यशस्वी खरेदीदारांना विक्री किंमतीची २५% रक्कम (इअरप्रती आधी भरलेल्या रकमेसह) ताबडतोब आणि उर्वरित ७५% रक्कम ३० दिवसांत भरावी लागेल, कसूर केल्यास, बँकेकडून खरेदीदारांनी आधी प्रदान/जमा केलेल्या रकमा जप्त केल्या जातील. प्रदानात कसूर झाल्यास, मिळकतीची पुनर्विक्री केली जाईल आणि कसूरवार खरेदीदारांना कोणताही हक्क सांगता येणार नाही.
५) प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे, मिळकतीवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मिळकतीच्या हक्क, भारांबाबत तसेच मिळकतीला बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/थकबाकीबाबत त्यांची स्वत: स्वतंत्र चौकशी करावी.
६) लिलावाच्या जाहिरातीत बँकेने कोणतेही अभिवचन दिले किंवा कोणतेही अभिवेदन दिले नाही आणि तसा समज करून घेऊ नये. बँकेला ज्ञात किंवा अज्ञात अशा सध्याच्या आणि भविष्यातील सर्व भारांसह मिळकत विकली जात आहे. कोणत्याही त्रयस्थ पक्षकारांच्या दावे/अधिकार/थकबाकीसाठी प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने प्रयोज्य कायद्यानुसार त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे मिळकतीच्या अभिहस्तांतरणासाठी सर्व सांविधिक थकबाकी, कर, देय शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. सोसायचे आहेत. कोणतेही कारण न देता कोणतीही बोली/निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा विक्री पुढे ढकलण्याचे किंवा रद्द करण्याचे निर्विवाद अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांना असतील.
७) मिळकतीच्या निरीक्षणासाठी, इच्छुक बोलीदार/निविदाकार दू. क्र. ०२२-६११५९९२९, मोबाईल क्र. : + ९१-९८१९९६०१०९ वर प्राधिकृत अधिकाऱ्यांना किंवा आमचे एन्फोर्समेंट एजंट मे. डेल्टा अमल्गमेटेड सर्व्हिसेस प्रा. लि. यांना दू. क्र. : ०२२-२२७०७०७०/ २२७०८०८०/२२७०४६४६, मोबाईल क्र. : ०९८२८४९४३७/०९८२८४९४७३५ वर संपर्क करू शकतात.
८) विक्री सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत विहित नियम/अटींच्या आणि निविदा दस्तावेजात स्थापित/नमूद सक्त अटींच्या अधीन होईल.

सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या नियम ८(६) अन्वये १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

लिलावाच्या तारखेपूर्वी आजतागायत व्याज आणि अनुषंगिक परिव्यय ह्यासह उपरोल्लेखित रक्कम प्रदान करण्यासाठी याद्वारे कर्जदार/जामीनदार/गहाणकारांना अधिसूचित केले जाते, कसूर केल्यास, मिळकतीचा लिलाव/विक्री होईल आणि शिल्लक थकबाकी राहिल्यास, व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल.

दिनांक : ०४.०४.२०१९ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई. — **स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक**